बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये
राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या
उमेदवारांनी द्यावयाचे जोडपत्र-१ व जोडपत्र-२

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र९/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २१/०१/२०१७

वाचा :- राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/रापनों/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/का.११, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१३ चे आदेश

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक २५/०२/२०१३ च्या आदेशान्वये महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषद निवडणुकांकरिता राजकीय पक्षांतर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवाराने सादर करावयाच्या जोडपत्र-१ व जोडपत्र-२ चे सुधारित नमुने विहित करण्यात आलेले आहेत. सदर नमुन्यामध्ये "उमेदवाराने विहित जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मधील सूचनापत्र नामनिर्देशनपत्र दाखल करावयाच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील" अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम २६ मध्ये नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या दिवशी संध्याकाळी ५.०० वाजण्यापूर्वी उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केले पाहिजे अशी तरतूद आहे. आणि सदर तरतुदीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी देण्यात येणाऱ्या निवडणूक कार्यक्रमामध्ये नामनिर्देशनपत्र स्विकारण्याचा कालावधी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० असा विहित करण्यात येतो. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवाराने

जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मधील सूचनापत्र दाखल करण्याची वेळ नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, आता आयोगाच्या उपरोक्त दिनांक २५/०२/२०१३ च्या आदेशामध्ये अंशत: सुधारणा करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे :

"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीकरिता राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवाराने सादर करावयाच्या जोडपत्र-१ व जोडपत्र-२ चा नमुना सोबत जोडण्यात आला आहे. या निवडणुकीमध्ये उमेदवाराने विहित जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मधील सूचनापत्र, नामनिर्देशनपत्र दाखल करावयाच्या अखेरच्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील."

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
२. सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष
३. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
४. निवड नस्ती

(राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.७/का.५, दि.२१ जानेवारी, २०१७ सोबतचे सहपत्र)

# जोडपत्र १

## राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींबाबत द्यावयाचे सूचनापत्र

(केवळ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी लागू)

प्रति,

१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

२) निवडणूक निर्णय अधिकारी,
प्रभाग क्र. ............, बृहन्मुंबई महानगरपालिका

विषय :- सार्वत्रिक / पोट निवडणूक बृहन्मुंबई महानगरपालिका
चिन्ह वाटपासाठी उमेदवारांची नावे कळविण्याचे दृष्टीने व्यक्तींना
प्राधिकृत करणेबाबत.

महोदय,

मी ,याद्वारे ................................ हा पक्ष ,जो राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष /राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष /नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्ष असून ,वरील निवडणुकीसाठी सदर पक्षाद्वारे पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींची नावे खालीलप्रमाणे कळवू इच्छितो :-

| सूचनापत्र पाठविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव /व्यक्तींची नावे (१) | पक्षामध्ये धारण करीत असलेले पद (२) | प्रभाग क्र. .......... बृहन्मुंबई महानगरपालिकेबाबत प्राधिकृत (३) |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

२. वर नमूद केलेल्या व्यक्तींची /व्यक्तींच्या नमुना स्वाक्षऱ्या खालीलप्रमाणे आहेत -:

(१) श्री ...................................... .यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) .............................................. (ब)............................................

(क) ...............................................

(२) श्री .............................................. .यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) .............................................. (ब)..............................................

(क ..............................................

(३) श्री .............................................. .यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) .............................................. (ब)..............................................

(क) ..............................................

आपला विश्वासू,

अध्यक्ष/सचिव

(शाईची अथवा बॉलपॉईंट पेनची स्वाक्षरी)

पक्षाचे नाव

पक्षाची मुद्रा

(सील)

ठिकाण :

दिनांक :

टीप :- सदर सूचनापत्रावर पक्षाचे अध्यक्ष ,सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपॉईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.

(राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.७/का.५, दि. २१ जानेवारी, २०१७ सोबतचे सहपत्र)

# जोडपत्र २

## राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे कळविणारे सूचनापत्र

(केवळ बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी लागू)

प्रति,

१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

२) निवडणूक निर्णय अधिकारी,
प्रभाग क्र. ............, बृहन्मुंबई महानगरपालिका

विषय :- बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक,
उमेदवार उभे करणेबाबत.

महोदय,

................................ पक्षातर्फे प्रभाग क्रमांक,.......... बृहन्मुंबई महानगरपालिका या सार्वत्रिक /पोट निवडणुकीमध्ये उभे करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे मी खालीलप्रमाणे कळवू इच्छितो:-

| प्रभागाचे नाव/ क्रमांक | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराचा पोस्टाचा पत्ता | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नामनिर्देशन छाननीमध्ये रद्द झाल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास त्याची जागा घेणाऱ्या पर्यायी उमेदवाराचे नाव | पर्यायी उमेदवाराच्या वडिलांचे/पतीचे नाव | पर्यायी उमेदवाराचा पोस्टाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

ठिकाण :

दिनांक :

आपला विश्वासू,

नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या
व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी.
(शाईची अथवा बॉलपॉईंट पेनची स्वाक्षरी)

पक्षाचे नाव
पक्षाची मुद्रा
(सील)

टीप :- (१) सदर सूचनापत्रावर अध्यक्ष ,सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपॉईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.

(२) सदर सूचनापत्र नामनिर्देशनपत्रे **दाखल करण्याच्या** शेवटच्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पोहोचविणे आवश्यक आहे.